दैनिक सामना दि. ०१/१०/२०२२

# गुणांकनानुसार ‘सीसीटीएनएस’ कामगिरीत नांदेड जिल्हा राज्यात प्रथम

नांदेड, दि. ३० (प्रतिनिधी)- अप्पर पोलीस महासंचालक गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून दर महिन्याला सीसीटीएनएस कामगिरीबाबत आढावा घेण्यात येतो. त्यात ऑगस्ट महिन्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर नांदेड जिल्ह्याने गुणांकनानुसार राज्यात पहिला क्रमांक पटकावला आहे.



राज्यातील सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये जिल्हानिहाय दर महिन्याला आढावा घेण्यात येतो. या प्रणालीअंतर्गत दाखल होणारे गुन्हे, प्रथम खबर, घटनास्थळ पंचनामे, आरोपी अटक, मालमत्ता जप्ती, दोषारोपपत्र, न्यायालयीन निकाल, हरवलेले व्यक्ती, अनोळखी मयत, अदखलपात्र खबर, गहाळ/बेवारस मालमत्ता, प्रतिबंधक कारवाई या व अशा प्रकारच्या एकूण १८ प्रकारच्या माहितीचा जिल्हानिहाय आढावा घेण्यात येतो. तसेच, सीसीटीएनएस प्रणालीचा दैनंदिन कामकाजात वापर करून गुन्हे प्रतिबंधक, गुन्हे उघडकीस आणून चांगली कामगिरी केल्याबाबतचीही नोंद होते. गणेशोत्सव, नवरात्री उत्सव यांची ऑनलाईन अर्जांची वेळेत नोंदणी व त्यांचे परवानगी पत्र देण्याचाही आढावा घेण्यात येतो. या सर्व प्रणालीचा प्रभावीपणे वापर केल्याने माहे ऑगस्ट- २०२२ मध्ये नांदेड जिल्ह्याने २४२ गुणापैकी २३७ गुण मिळवून महाराष्ट्र राज्यात पहिला क्रमांक मिळविला आहे.

नांदेड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक प्रमोद शेवाळे यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली जिल्हयातील नोडल अधिकाऱ्यांनी या प्रणालीच्या माध्यमातून चांगल्या नोंदी ठेवून व उत्कृष्ट काम करुन नांदेड जिल्ह्याला हा पहिला क्रमांक मिळवून दिला आहे. पोलीस उपमहानिरीक्षक निसार तांबोळी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक प्रमोद कुमार शेवाळे व त्यांच्या टिमचे अभिनंदन केले आहे.

देशोन्नती दि. ०१/१०/२०२२

# नांदेड जिल्हा पोलीस दलाचा ‘सीसीटीएनएस’ कामगिरीमध्ये राज्यात प्रथम क्रमांक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ अप्पर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडुन पोलीस घटकांच्या सीसीटीएनएस कामगिरी बाबतचा आढावा दर महिन्यात घेण्यात येतो राज्यातील सर्व घटकांचे माहे ऑगस्ट २०२२ मधील सीसीटीएनएस मासिक कामगिरी अहवालांचे अवलोकन करुन देण्यात आलेल्या गुणांकनानुसार नांदेड जिल्ह्याने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये नांदेड जिल्ह्यातील ३६ पोलीस स्टेशन येथे दाखल होणार प्रथमखबर, घटनास्थळ पंचनामे, आरोपी अटक, मालमत्ता जप्ती, दोषारोप पत्र, न्यायालयीन निकाल, हरवलेले इसम, अनोळखी मयत, अदखलपात्र खबर, गहाळ - बेवारस मालमत्ता, प्रतिबंधक कार्यवाही व इतर नोंदी अश्या एकुण १८ प्रकारच्या माहितीची सीसीटीएनएस कार्यप्रणालीमध्ये नोंदी करण्यात येतात. तसेच सीसीटीएनएस प्रणालीचा दैंनदिन कामकाजात. वापर करुन गुन्हे प्रतिबंध, गुन्हे उघडकीस आणुन चांगली कामगिरी करण्यात आली तसेच आयटीएसएसओ, आयसीजेएस व सिटीजन पोर्टलवरील इ - कंप्लॅन, गणेश उत्सव, नवरात्र उत्सव यांची ऑनलाईन अर्जाची वेळेत निर्गती व प्रभावीपणे वापर केल्याने माहे ऑगस्ट २०२२ मध्ये नांदेड जिल्ह्याने २४२ गुणांपैकी २३७ गुण मिळवुन महाराष्ट्र राज्यात प्रथम क्रमांक आला आहे.

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सीसीटीएनएस नोडल अधिकारी अप्पर पोलीस अधीक्षक नांदेड निलेश मोरे, अप्पर पोलीस अधिक्षक भोकर विजय कबाडे व त्यांची सीसीटीएनएस टीम पोलीस उपनिरीक्षक रहिम बशीर चौधरी, पोलीस उपनिरीक्षक प्रणिता बाभळे, पोलीस नाईक समीरखान मुनीरखान पठाण, पोलीस नाईक ओंकार सुरेश पुरी, पोकॉ माधव नारायण येईलवाड यांचास परिश्रमामुळेच नांदेड पोलीस दलाने राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.